साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * मंगळवार, दि. २८ मे २०२४ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## पालकमंत्री ना.मुंडे यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्यात सर्वाधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

बीड (बातमीदार):- बीड जिल्ह्यात मराठा-कुणबी, कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्र वाटपाच्या संख्येने ८२ हजारांचा आकडा ओलांडला असून, जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कामगिरीमुळे बीड जिल्ह्यात महाराष्ट्रात सर्वाधिक कुणबी नोंदी बीड जिल्ह्यात आढळल्या आहेत. विशेष म्हणजे एका विशिष्ट जातीतील अधिकारी यांना लक्ष्य करत त्यांच्या कार्य-कर्तृत्वार प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या काही मोजक्या लोकांना ही मोठी चपराक असल्याचे मानले जात आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या नेतृत्वात आतापर्यंत २७ लक्ष पेक्षा अधिक कुणबी नोंदी तपासल्या गेल्या असून, आज पर्यंत तब्बल ८२ हजार ५४५ जणांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा आकडा मराठवाड्यासह महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. याउपर आणखी सुमारे ८ ते १० हजार प्रमाणपत्रे पडताळणी मध्ये असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

महाराष्ट्रात मराठा समाजाच्या आंदोलन कार्याला आलेल्या यशानंतर राज्य शासनाने विशेष मोहीम राबवत कुणबी नोंदी शोधण्याचे व त्यावरून कुणबी प्रमाणपत्र देण्याचे कार्य युद्ध पातळीवर सुरू केले. यामध्ये बीड जिल्हा सर्वात पुढे आहे. विशेष म्हणजे मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात निवडणूक आचारसंहिता व प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पडली असून, त्याचा कुणबी प्रमाणपत्र वातपावर कोणताही परिणाम होणार नाही याची परिपूर्ण काळजी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या नेतृत्वात जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत देखील हा मुद्दा मोठ्या प्रमाणावर गाजला. एका विशिष्ट जातीतील अधिकारी वर्गाला या दरम्यान लक्ष्य करत सातत्याने आरोप करण्यात आले. मात्र त्याच अधिकाऱ्यांनी गतिमान प्रशासन राबवत बीड जिल्ह्यात राज्यात सर्वाधिक कुणबी नोंदी तपासत सर्वाधिक कुणबी प्रमाणपत्र वाटप केली असून, हा आकडा आणखी दिवसेंदिवस वाढणार आहे. नुकतीच पार पडलेली लोकसभा निवडणुक व त्यादरम्यान विविध जातींच्या नावाने उठवण्यात आलेली राळ या सर्वांना ही आकडेवारी चकित करणारी असून, सुज्ञ मराठा बांधवांकडून मात्र पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वातील बीड जिल्हा प्रशासनाचे आभार व्यक्त केले जात आहे. ***

## केतकी दिपक ईटके हिचे दहावीच्या परीक्षेत यश



परळी वैजनाथ (बातमीदार):- येथील विद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थिनी केतकी दिपक इटके हिने दहावीच्या परीक्षेत ९२.४० टक्के घवघवीत यश संपादित केल्याबद्दल सर्वस्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.

ती वैद्यनाथ बँकेतील अधिकारी दिपक ईटके यांची कन्या असून तिने दहावीच्या परीक्षेत ९२.४० टक्के मार्क घेत घवघवीत यश संपादित केले. जेष्ठ नेते दत्ताप्पा ईटके यांच्यासह विद्यावर्धिनी शाळेचे शिक्षकवृंद, इटके परिवारातील सर्व सदस्यांनी तिचे अभिनंदन केले आहे. ****

## 'राजस्थानी मल्टीस्टेट'च्या पदाधिकाऱ्यांवर फसवणुकीचा गुन्हा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- जादा व्याजाचे आमिष दाखवून परळी शहरात १४२ ठेवीदारांची साडेसात कोटी रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी येथील राजस्थानी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन चंदुलाल बियाणीसह १७ संचालक व अधिकाऱ्यांच्या विरोधात परळी पोलिस ठाण्यात गेल्या शुक्रवारी (दि.२४) पहाटे गुन्हा दाखल झाला आहे. यापूर्वीही या मल्टीस्टेटवर लातूरमध्ये गुन्हा दाखल झालेला असून तेथील पोलिसांनी परळीची शाखा सील केली आहे.

या संस्थेडचे चेअरमन चंदुलाल बियाणी, संचालक बालचंद लोढा, अभिषेक चंदुलाल बियाणी, बद्रीनारायण बाहेती, प्रल्हाद अग्रवाल, विजय लड्डा, अशोक जाजू, सतीश सारडा, प्रेमलता बाहेती, कल्पना बियाणी, नामदेव रोडे, जगदीश बियाणी, अधिकारी व्ही.बी.कुलकर्णी, तुषार गायकवाड, प्रदीप मुरकुटे, राजेश मोदाणी व सोसायटीचे इतर कर्मचारी अशी आरोपींची नावे आहेत. वीज कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी बिभीषण मानाजी तिडके (रा.नेहरू चौक परळी) यांनी फिर्याद दिली आहे. मागील सहा महिन्यांपासून राजस्थानी च्या परळी येथील मुख्य कार्यालय, अरुणोदय मार्केट, पंचशीलनगर, नेहरू चौक, गणेशपार रोड, थर्मल रोड अशा पाच शाखा बंद आहेत. चेअरमन व संचालक मंडळही गायब आहे. पैसे परत देण्यासंदर्भात तहसील कार्यालयासमोर उपोषणाचा मार्गही अवलंबला होता. तसेच २५ एप्रिल रोजी तक्रारही दिली होती. परंतु गुन्हा दाखल झाला नव्हता. गेल्या शुक्रवारी याला मुहूर्त लागला. श्री तिडके यांच्या फिर्यादीनुसार त्यांनी स्वतः व पत्नीच्या नावाने नेहरू चौक शाखेत १३ लाख ३३ हजार २५१ रुपयांची एफडी केली होती, परंतु हे पैसे परत मिळाले नाहीत. तीन दिवसांपूर्वीही ठेवीदारांनी सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार ससाने यांची भेट घेतली होती. गुरुवारी पुन्हा ठेवीदार एकत्र आले आणि गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला. एकूण १४२ ठेवीदारांचे ७ कोटी ५३ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, १४२ ठेवीदार एकत्र आले आणि पोलिस निरीक्षकांची भेट घेतली. राजस्थानी मल्टीस्टेटच्या चेअरमन व संचालक मंडळाविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. अखेर गुन्हा दाखल करण्यात आला असे ठेवीदार सेवकराव जाधव यांनी सांगितले. ***

# दहावीच्या निकालात न्यू हायस्कूल शाळेची परळी तालुक्यात आघाडी; शाळेचा ९९.७० टक्के निकाल

## ९९.६० टक्के गुण घेऊन गुळभिले, धोंडगे, दहिफळे, सोळंके हे विद्यार्थी शाळेतून पहिले



परळी वैजनाथ, (बातमीदार):- गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेचा येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू हायस्कूल शाळेचा निकाल ९९.७० टक्के लागला असून १४२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यावर गुण घेतले आहेत.

९९.६० टक्के गुण घेवून प्रकाश उर्फ सार्थक रवी गुळभिले, श्रीनिधी अगस्ती धोंडगे, ऋतुजा विष्णू दहिफळे, श्रेया संभाजी सोळंके हे चार विद्यार्थी शाळेतून पहिल आले आहेत तर ९९.४० टक्के गुण घेवून शिवकन्या ब्रम्हदेव घुगे, राणी ज्ञानोबा दहिफळे या विद्यार्थिनी शाळेतून दुसऱ्या तर सानिका संजय तांदळे, ओमकार सखाराम मुंडे हे विद्यार्थी ९९.२० टक्के गुण घेवून शाळेतून तिसरे तर राणी दीपक शिंदे ९९ टक्के घेवून शाळेतून चौथी आली आहे.

शाळेतील ४६ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत ९५ टक्क्यापेक्षा अधिक गुण घेतले आहेत. तर १४२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यावर गुण मिळवले आहेत. या परीक्षेला शाळेतून ३४४ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यासह ३८९, प्रथम श्रेणीत ४१, द्वितीय श्रेणीत १३ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. परीक्षा बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी या शाळेतील एकच विद्यार्थी नापास झाला आहे. शाळेचा निकाल ९९.७० टक्के लागला आहे. हा निकाल परळी तालुक्यात मराठी माध्यमाच्या शाळेत उल्लेखनिय आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ.सतिशभाऊ चव्हाण व सर्व कार्यकारिणी संचालक तसेच शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके व इतर सर्व सदस्य, मुख्याध्यापक बी.ए.नाईकनवरे, पर्यवेक्षक बालासाहेब राठोड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, उच्च माध्यमिक विभागाचे प्रभारी श्री लोमटे यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंदांनी केले आहे. दरम्यान, निकाल लागल्यानंतर गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा शाळेत पेढे व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय समितीचे सदस्य बाळासाहेब देशमुख, जेष्ठ संचालक उत्तमराव देशमुख, सूर्यकांतराव देशमुख, अजय सोळंके, जेष्ठ शिक्षिका छाया देशमुख, सतिश शहापुरे यांच्यासह विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, शाळेतील सर्व शिक्षकांचे परिश्रम, पालकांचे सहकार्य, संस्थेचे पदाधिकारी व संचालक यांचे मार्गदर्शन यामुळेच आम्ही हे यश मिळवू शकलो असे मुख्याध्यापक श्री नाईकनवरे यांनी सांगितले. ***

# मुलगा १० वेळा नापास तरीही जिद्द कायम; ११ व्या प्रयत्नात दहावीत मिळवलं यश

परळी वैजनाथ, (बातमीदार):– '१२ वी फेल' या सत्यकथेवर आधारलेल्या चित्रपटच्या कथानकाची परळी तालुक्यात पुनरावृत्ती झाल्याचे उदाहरण १० वी च्या निकालानंतर समोर आले आहे. अतिशय रंजक वाटावी अशी ही सत्य कथा असून तब्बल १० वेळा दहावीला नापास झालेल्या आपल्या मुलाला कोणत्याही परिस्थितीत पास होईपर्यंत परीक्षा द्यायलाच लावायची या जिद्दीला पेटलेल्या वडिलांची इच्छा अखेर पूर्ण झाली आहे. काल जाहीर झालेल्या निकालात ११ व्या प्रयत्नात या मुलाने अखेर मॅजिक सक्सेस मिळवले आहे मिळवले आहे. या गोष्टीचा त्याच्या कुटुंबीयालाच नाही तर अख्या गावाला आनंद झाला आहे.

१२ वी फेल हा २०२३ चा विधू विनोद चोप्रा दिग्दर्शित, निर्मित आणि लिखित भारतीय हिंदी–भाषेतील चरित्रात्मक नाट्य चित्रपट आहे. हे भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी बनण्यासाठी अत्यंत गरिबीवर मात करणाऱ्या मनोज कुमार शर्मा यांच्याविषयी अनुराग पाठक यांच्या २०१९ च्या नामांकित नॉन–फिक्शन पुस्तकावर आधारित आहे. या चरित्रात्मक नाट्य चित्रपटाच्या कथानकाशी अगदी तंतोतंत जुळणारीच कथा वाटावी अशा प्रकारचे सत्य उदाहरण परळी तालुक्यात दहावी परीक्षेच्या बाबतीत बघायला मिळाले आहे. परळी तालुक्यातील डाबी या गावचे रहिवासी असलेल्या सायस उर्फ नामदेव मुंडे यांचा कृष्णा हा मुलगा सन २०१८ या वर्षात दहावीला होता. २०१८ ची दहावीची परीक्षा दिल्यानंतर तो या परीक्षेत अनुत्तीर्ण झाला. वडील सायनस उर्फ नामदेव मुंडे हे अगदी सर्वसामान्य कामगार आहेत. संपूर्ण जीवन अतिशय कष्टात व बांधकामावर कामगार म्हणून काम करण्यात त्यांनी घालवले आहे. काहीही झाले तरी आपला मुलगा दहावी पास झाला पाहिजे ही मनोमन इच्छा त्यांच्या मनात होती. त्यामुळे नापास झाले तरी हरकत नाही तू पास होईपर्यंत परीक्षा देत रहा असे म्हणत त्यांनी कृष्णा या आपल्या मुलाला आजपर्यंत परीक्षा द्यायला लावली.



तब्बल दहा वेळा नापास झाल्यानंतर आज जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात अकराव्या प्रयत्नात कृष्णाला अखेर जादुई यश मिळाले आहे. या यशाने वडील सुखावून गेले असून त्यांना आपले आनंदाश्रू ही रोखता आले नाही. एवढेच नाही तर अख्या गावाला या यशाचा इतका आनंद झालेला आहे की, कृष्णाने उत्तुंग यश मिळवल्यासारखे अभिनंदन त्याचे संपूर्ण गाव करत आहे. अकराव्या प्रयत्नात दहावी पास होणाऱ्या कृष्णाला अक्षरशः डोक्यावर घेऊन गाव आनंद व्यक्त करत आहे. दहावी उत्तीर्ण झालेला कृष्णा एक प्रकारे सद्यस्थितीला डाबीकरांचा हिरो बनला आहे.

दहावीच्या निकालात शंभर टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे कौतूक केले जाते. मात्र, १० वेळा सर्वच विषयात नापास होऊन ११ व्या प्रयत्नात 'मॅजिक सक्सेस' गाठणाऱ्या कृष्णाचे सर्वच स्तरातून विशेष कौतूक होत आहे. दहावी परीक्षेत नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त मार्क मिळण्यासाठी यंदा जणू स्पर्धाच सुरु होती. जिल्ह्यात तब्बल ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. मात्र, परळी वैजनाथ तालुक्यातील डाबी या गावात निकालाचा आगळा वेगळा आनंद साजरा केला जात आहे. कृष्णा हा टोकवाडी येथील रत्नेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याच्या या आगळ्या वेगळ्या यशाची सध्या सगळीकडेच चर्चा सुरु आहे.

याबाबत डाबी येथील गावकऱ्यांनी सांगितले की, कृष्णाची घरची परिस्थिती अगदी बेताची असून आईवडिल दोघेही मजुरी करतात. कृष्णाही मजूरीची छोटी मोठी कामे करतो.शाळेतील परीक्षेचे शुल्क भरण्यासाठीही त्यांच्याकडे पैसे नसायचे तरीही त्याच्या वडीलानी जिद्द सोडली नाही.परीक्षेच्या काळातही पेपर संपल्यानंतर तो वडिलांसोबत मजुरी करत होता. नियमित कामाला जात असल्यामुळे आपण परीक्षा देवू शकणार नाही, असे त्याने वडीलांना सांगीतले होते. पण, वडीलांनी त्याला सतत परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहन दिले. आज तो अखेर उत्तीर्ण झाला असुन सध्या मित्रांकडून त्याच्या गुणपत्रकाचा फोटो व्हाट्सअॅप, फेसबूकवरुन व्हायरल करुन कौतूक केले जात आहे. **

# दहावीच्या परीक्षेत विद्यावर्धिनी विद्यालयाचा ९९.५७ टक्के निकाल

## १०० % गुण घेऊन आदित्य वडूळकर शाळेतून पहिला

परळी वैजनाथ, (बातमीदार):– गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत येथील नवीन शक्तीकुंज वसाहतीतील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यावर्धिनी विद्यालयाचा निकाल ९९.५७ टक्के लागला असून ११८ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यावर गुण घेतले आहेत.

१०० टक्के घेवून आदित्य जगन्नाथ वडूळकर शाळेतून पहिला तर ९९.६० टक्के गुण घेवून ऋषिता ज्ञानोबा मुंडे दुसरी तर ९९.४० टक्के गुण घेवून ऋतुजा नरहरी फड तिसरी आली आहे. या परीक्षेला शाळेतून २३६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ५४ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यावर गुण घेतले आहेत. तर २७ विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात तर चार विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री काठोये, उपमुख्य अभियंता श्री आवचार, श्री बनकर, कल्याण अधिकारी श्री राठोड, गटशिक्षणाधिकारी श्री कनाके, संस्थेचे श्री कोळगे, श्री भिंगोरे, श्री इटके, श्री पैंजणे, श्री मुंडे, श्री सावंत, श्री चेवले, मुख्याध्यापक, उन्मेष मातेकर, राजेश्वर निला, राजेश्वर नांदूरकर, जे.व्ही.सुमठाणे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी वृंदांनी केले आहे.*

# न्यू हायस्कूल हिवरा (गो.) शाळेचे दहावी परीक्षेत यश

परळी वैजनाथ, (बातमीदार):– गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत तालुक्यातील हिवरा (गो.) येथील न्यू हायस्कूल शाळेचा निकाल ९४.२८ टक्के लागला आहे. या परीक्षेत ९०.६० टक्के गुण घेवून विश्रांती वैजनाथ भांड पहिली, ८६.८० आदिती संतोष भालेकर दुसरी, ८२.२० टक्के गुण घेवून आरती उद्धवराव निर्मळ ही शाळेतून तिसरी आली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ.सतिशभाऊ चव्हाण व सर्व कार्यकारिणी संचालक तसेच शालेय समितीचे अध्यक्ष अनंतराव निर्मळ पाटील व इतर सर्व सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षकवृंदांनी केले आहे. **

# दहावीच्या परीक्षेत आरती लुगडे हिचे यश



परळी वैजनाथ, (बातमीदार):– दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला आहे. या परीक्षेत आरती लुगडे हिने ८७.४० टक्के गुण घेतले आहे.

तिच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांची आरती ही मुलगी आहे. ***




संपादकीय...

# वाढती लाचखोरी चिंताजनक

**-० सुविचार ०-**
प्रभावाने जवळ येणाऱ्या लोकांपेक्षा स्वभावाने जवळ येणाऱ्या लोकांना जपा, आयुष्यात कधीच पश्चाताप होणार नाही.

अनेक पतसंस्थेच्या मनमानी कारभाराने व त्या बंद पडल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणूस हवालदिल झालेला आहे. बंद पडलेल्या पतसंस्थांतून आपल्या ठेवी परत मिळाव्यात म्हणून ठेवीदार, ग्राहकांचे सध्या मोठे प्रयत्न चालू आहेत. बंद पडलेल्या पतसंस्था आणि त्यात अडकलेल्या ठेवी यामुळे बीड जिल्ह्याच्या विविध माध्यमातून दररोज नव नव्या बातम्या येत आहेत. यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा ढवळून निघतो आहे. त्यातच सरकारी कार्यालयातील लाचखोरीचे पेव जिल्ह्यात फुटले आहे.

जिल्ह्यात एका मागून एक लाचखोरीच्या घटना घडत आहेत. लाचखोरीत अडकलेल्या सरकारी समाजसेवकांकडे कोटीच्या कोटी बेहिशोबी मालमत्ता सापडत आहे. यामुळे सर्वसामान्यांत चिंता वाढली आहे व व्यवस्थेवर तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. लाचखोरीच्या एका मागून एक घडणाऱ्या घटनांमुळे पुन्हा जिल्हा ढवळून निघाला आहे. यामुळे बीड जिल्ह्याची चौफेर मोठी बदनामी होताना दिसते आहे.

कोणतेही सरकारी कार्यालय असो तिथे लाचखोरी नवी नाही. अधिकारी कर्मचाऱ्यांना चिरीमीरी दिल्याशिवाय सर्वसामान्यांची कामे होत नाहीत. एखाद्या कामासाठी चिरीमिरी दिली नाही तर आपल्या कामासाठी संबंधित कार्यालयात चकरावर चकरा सर्वसामान्यांना माराव्या लागतात. असा प्रकार आहे. चकरा मारण्यापेक्षा चार पैसे देऊन आपले काम करुन घेण्याकडे सर्वसामान्यांचा कल वाढतो आहे. त्यातूनच सरकारी कार्यालयात भ्रष्टाचार बोकाळतो आहे. झटपट श्रीमंत होण्याचा मोह आज अनेकांना जडला आहे. कष्ट न करता फुकट पैसा मिळवण्याकडे अनेकांचा कल वाढला आहे. यात अनेक सरकारी बाबू आघाडीवर आहेत. त्यात बीड जिल्ह्यात 'कसेही नाचा आणि काहीही करा आपले काहीच होत नाही' अशी धारणा अनेकांची होऊन बसल्याने सरकारी कामासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची झोळी भरल्याशिवाय कामच होत नाहीत असा प्रकार आहे. या प्रकारामुळे त्रस्त झालेला सर्वसामान्य माणूस लाचखोरी बाबत मोठ्या हिंमतीने तक्रारी करतो आहे. यामुळे लाचखोरीच्या घटना बाहेर येत आहेत.

लाचखोरी कमी व्हावी, सर्वसामान्यांची कामे वेळेवर व्हावीत म्हणून वरिष्ट पातळीवर कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. यामुळे लाचखोरीला एका अर्थाने बळच येथे मिळते आहे. सभोवतालची सरकारी कार्यालयातील माणसे झटपट श्रीमंत कशी होतात? हा प्रश्न सर्वसामान्य कष्ट करणाऱ्यांना पडला आहे. यामुळे त्यांचा व्यवस्थेवरील विश्वासच उडून जातो आहे. पगाराबरोबरच इतर मार्गाने बक्कळ पैसा मिळत असल्याने सरकारी नोकऱ्या मिळवण्याकडे नव्या पिढीचा कल वाढला आहे. त्यातही भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळल्याने लायक, गुणवंत व पैसे नसलेल्या सर्वसामान्यांवर अन्याय होतो आहे. सरकारी नोकरीसाठी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे या भ्रष्ट व्यवस्थेचे आज मोठे आव्हान उभे आहे.

समाजात लाचखोरी व भ्रष्ट व्यवस्था दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. आणि गरीब, कष्टकरी माणूस कष्टाच्या ओझ्याने दडपून जातो आहे. त्यामुळे त्याच्या जगण्यात उदासिनता, चिड या व्यवस्थेविरुद्ध निर्माण झाली आहे. लाचखोरी व भ्रष्टाचाराला हद्दपार करण्यासाठी ठोस उपाययोजना, कडक कायदे व गुन्हेगाराला मोठी शिक्षा होणे गरजेचे आहे. कडक कायद्याचा धाक व मोठी शिक्षा झाल्याशिवाय समाजातील लाचखोरी व भ्रष्टाचार कमी होणार नाही. बीड जिल्ह्यात वाढत्या लाचखोरीच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी वरिष्ट पातळीवर ठोस पावले उचलण्याची गरज आहे. **

# 'डे झिरो च्या उंबरठ्यावरचा पावसाळा'!

**'नेमेची येतो पावसाळा या म्हणीप्रमाणे तो आला पण एक इशारा त्यासोबत आहे. तो जाणला तर आपण या पावसाळ्या पाठोपाठ दुष्काळांचं दुष्टचक्र थांबू शकणार नाही बंगळूरुनं दिलाय इशारा त्याकडे लक्ष देत गांभीर्यानं पावसाचं स्वागत करताना पाणी जपलं नाही तर 'डे झिरो' येऊ घातला. पाणी – बाणी बाबत खास लेख.**

आपल्या मराठी भाषेत खास काही गुण आहेत आणि भाषेची काही वैशिष्ट्ये देखील आहेत, अलंकार, वृत्त आणि इतर विविध प्रकारांनी समृद्ध अशा या आपल्या मराठी भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणून भाषक म्हणींचा उल्लेख करता येईल. तसे म्हणींचा हा प्रकार सर्वच भाषांमध्ये असला तरी मराठीत याचे महत्त्व वेगळे आहे. अतिशय चपखलपणे मोजक्या शब्दात मार्मिक पद्धतीने आपल्याकडे म्हणी आढळतात अर्थात हा भाषिक प्रवास करण्याचा भाग वेगळ्याच कारणाने आहे.

आपल्याकडे आनंदवार्ता आली.. मान्सून अर्थात नैऋत्य मौसमी पाऊस नियमित आराखडा बाजूला ठेवत ३ दिवस आधी अंदमानात दाखल झालाय मात्र आपल्याकडे अशा पल्लवीत होत असताना देखील तहान भागत नाही कारण अर्थातच पाणी. पाणीबाणी, पाण्याचे संकट, पाण्याचे दुर्भिक्ष्य पासून दुष्काळापर्यंत शब्द माध्यमातून उमटतात आणि पाण्याचं संकट अधिक गहिरं होतं आहे असं जाणवायला लागतं.

आपल्या खंडप्राय भारत देशात एकाचवेळी काही ठिकाणी दुष्काळ तर काही ठिकाणी अतिवृष्टी असं विषम चित्र आहे आणि याचं कारण देखील तसंच आहे. कारण आपला देश हा मौसमी हवामान क्षेत्रात आहे. आसेतू हिमाचल अशा विस्तीर्ण देशात ही स्थिती आपरिहार्य आहे असेच म्हणता येईल. मात्र वारंवार काही भागात निर्माण होणारी पाण्याची टंचाई आणि त्याच्याशी निगडित बाबी आपल्या नियोजनाशी जोडलेल्या आहेत.



गेल्या काही वर्षात झपाट्याने झालेले नागरिकीकरण आणि शहरांचा विस्तार व सोबतच झपाट्याने वाढणारी लोकसंख्या यांचा या पाणी प्रश्नाशी जवळचा संबंध आहे. वाढत्या शहरीकरणामुळे पाणी प्रश्न गंभीर होत आहे आणि त्यातही पिण्याचे पाणी अर्थात पेयजलाची समस्या अत्यंत गंभीर आहे आणि याची पहिली धोक्याची घंटा ८ वर्षांपूर्वीच आपण दक्षिण आफ्रिकेत ऐकलेली आहे. या ठिकाणी पाणी समस्या गंभीर होत पेयजल शून्य स्थिती २०१७ साली आली ज्याला आपण 'डे झिरो' म्हणून नाव दिलं.

पेयजल उपलब्धता आणि लोकसंख्या यांची सांगड योग्यरित्या बसवता आली त्यामुळे केप टाऊन मध्ये 'डे झिरो' आल्यानंतरही आपण त्यापासून काही धडा घेतला नाही असेच म्हणावे लागेल. कारण ३ महिन्यापूर्वी बंगळूरु शहरात थोड्याफार फरकाने 'डे झिरो'ची स्थिती आली होती.

बंगळूरूने गेल्या वर्षभराच्या कालावधीत शहरात पाण्याने तुंबलेले रस्ते आणि पूरस्थिती असे चित्र एका बाजूला बघितले तर दुसऱ्या बाजूला घरटी २५० लिटर पाण्याची मारामार सुरू असल्याचे चित्र होते. आपणाकडे पाण्याबाबत ज्या म्हणी आहेत त्याची आठवण आजच्या स्थिती प्रकर्षाने होते. सध्या बंगळूरूमध्ये पाण्यासाठी जो आटापिटा होत आहे आणि जलसंधारण प्रयत्न सुरू करण्यात आली आहेत ते म्हणजे 'तहान लागल्यावर विहीर खोदणं' होय.

शहरातील मोठ-मोठे तलाव बुजवून त्यावर टोलेजंग इमारती उभारताना प्रत्येकाला जाणीव होती की यामुळे आपण पर्यावरणाचं नुसतं संतुलन बिघडवत नाही तर पर्यावरण व्यवस्था बाद करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सध्या 'आडात नाही तर पोहऱ्यात कसं येणार' या म्हणीचा पूर्ण प्रत्यय बंगळूरुवासीयांना आला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या महानगरात नोकरी करताना दरमहा लाखेंचा पगार मिळतो हे आकर्षण असलं तरी जगण्याची मूलभूत गरज अर्थात पाणी नसेल तर काय याचं उत्तर त्यांना शोधावं लागतंय. चिक्कार पैसा कमावला पण तो 'पाण्यासारखा आणि पाण्यासाठीच' खर्च करावा लागतोय हे बंगळूरूचं वास्तव आहे.

शहराचे नियोजन करताना पुढील साधारण २५ ते ५० वर्षात या भागात काय स्थिती असेल याचा अभ्यास गरजेचा असतो. होणाऱ्या विस्तारासोबत अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा विकास झाला पाहिजे अन्यथा नव्याने आकारास येणारी शहरे हे पांगळी होतात, बकाल होतात. थोड्याफार फरकाने याच प्रकारे सर्वत्र वाटचाल झाल्याने भारतात पहिला धोक्याचा इशारा बंगळूरुमधून आला आहे.

मानव संस्कृतीचा इतिहास बघितला तर स्पष्टपणे समोर येतं की जंगली आयुष्य असो वा टोळ्यांमधून (टोळी) जगणं त्याही काळी आणि नंतर नागर संस्कृती व शेतीप्रधान समाजाचा विस्ताराचा आधार नद्या आणि पाण्याचे स्रोत हाच राहिलेला आहे. मानव विकासाच्या मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष करून विकासकांनी केलेल्या नवनगरांमध्ये पाणी ही सर्वात मोठी समस्या आहे.

बंगरूळसारखा धडा समोर आहे जोडीला सर्व विकासाचे नियम पाळणारी देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे. मुंबई महानगर आणि लगतची लोकसंख्या २ कोटींवर पोहोचली असली तरी मुंबई किमान पिण्याच्या पाण्याबाबत आणि एकूणच पाण्याच्या वापराबाबत उत्तमरीत्या विकसित झालेले शहर आहे.

आपणास शहरीकरण आणि पर्यावरण यांचे सर्वोत्तम संतुलन 'सिंगापूर'मध्ये पहायला मिळते सिंगापूरचे आर्थिक बाबतीत असलेले जगातले स्थान अव्वल आहे. सहाजिकच या ठिकाणी शहर विस्तार अपरिहार्य असताना निसर्गानं दिलेला पाण्याचा प्रत्येक थेंब योग्यरित्या वापरण्याचं कसब सिंगापूरनं दाखवलय.

सिंगापूरचा संपूर्ण विस्तार पावसाचं पाणी साठविण्यासाठी 'बकेट' प्रमाणे होईल असाच राखला आहे. यश मिळणं ही लॉटरी नाही तर त्यामागे नियोजन, जलव्यवस्थापन आहे. हे सिंगापूरचा धडा आपणास शिकवतो. शेती आणि उद्योग यांच्यासाठी पाणी आवश्यक आहे. पाणी नसणाऱ्या ठिकाणी वस्ती निर्माण करायची व त्यासाठी भूजल साठ्याचा उपसा करायचा असं करीत पैशापायी जमिनीची चाळण करून भूजल साठाही आता संकटात आला आहे. ही अंदाधुंद वृत्ती चुकीचीच आहे याचं भान आपण ठेवलं पाहिजे. तो येतोय अशा जागवतोय. तो पाऊस बरसणार हे देखील नक्की पण त्याच्याशी मैत्री करून त्याला आपण साठवलं नाही तर आपण पुन्हा असंच पाण्यासाठी तरसणार हे ही नक्की आता 'पुढच्यास ठेच' लागलीय या म्हणीचा मतीतार्थ जाणून आपण शहाणं व्हावं अन्यथा 'डे झिरो' अटळ आहे.

**– प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
* वर्ष ०८ * अंक ०३ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) मंगळवार, दि. २८ मे २०२४ * किंमत : २ रू.

# शक्तीपीठ महामार्गास विरोध; बाधित शेतकरी संवाद यात्रेस मोठा पाठींबा

## महामार्ग बाधित शेतकऱ्यांची एकजूट

परळी वैजनाथ, (बातमीदार):- पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्ग मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यातून जात असून या महामार्गात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी जात असल्याने शेतकरी भूमिहीन होणार असल्याने या महामार्गाविरोधात बाधित शेतकरी एकजूट होत असून प्रस्तावित महामार्गावरील अनेक गावांत शेतकरी संवाद यात्रा सुरू करण्यात आली आहे.अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथे संपन्न संवाद यात्रेत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन कायमस्वरूपी शेतकरी भूमिहीन होणार आहेत.यामुळे पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करत आहेत.याच अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची विभागीय बैठक संपन्न झाली.या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकरी संवाद यात्रा मागील ५ दिवसापासून सुरू करण्यात आली असून या संवाद यात्रेस शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.गुरुवार दि २३ रोजी ही संवाद यात्रा अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथे पोहचली.या ठिकाणी परळी व अंबाजोगाई तालुक्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत असे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संवाद यात्रा प्रसंगी दासराव हांबर्डे (नांदेड), पोपटराव घाटूळ (परभणी), ॲड.गजेंद्र येळकर, कॉ.ॲड.अजय बुरांडे (जिल्हा अध्यक्ष किसान सभा, बीड) रविंद्र देवरवाडे, प्रशान्त मस्के ,चंदनशिवे सर, अशोक खामकर, बाबासाहेब यशवंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी गित्ता, गिरवली, भारज, सायगाव, नांदगाव, चाडगाव आदी गावातील बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.❊❊



शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या नावाखाली शेतकऱ्यांची सुपीक जमीन कवडीमोल भावात संपादित करून कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचे काम हे केंद्र आणि राज्य सरकार करत आहे.महामार्गापेक्षा मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न होण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या जमिनी विविध कारणांनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे कट कारस्थान सरकार कडून सुरू आहे.शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या हक्कासाठी अखिल भारतीय किसान सभा सदैव सोबत आहे.

**- ॲड.अजय बुरांडे** (शेतकरी नेते, बीड)

# लोकसभा निवडणुकीमध्ये परळी विधानसभेमध्ये बोगस मतदान केले आहे; फेर मतदान घ्या- ॲड.माधव जाधव

बीड (बातमीदार):- बीड लोकसभा मतदार संघासाठी १३ मे रोजी मतदान झाले. बीड लोकसभा मतदारसंघातील परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व नेतेमंडळींनी बोगस मतदान केले.

मतदारांना आदल्या दिवशी पैसे वाटप करून त्यांच्या बोटांना शाई लावून दुसऱ्या दिवशी निवडणुकीत मतदान न करण्याबाबत त्यांना सुचित केले. तसेच निवडणुकीच्या दिवशी सुद्धा मतदारांना पैशाचे वाटप करून त्यांच्या बोटांना शाई लावून त्यांना मतदानापासून वंचित ठेवले.त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी बुथ ताब्यात घेऊन मतदारांना मतदानापासून दूर ठेवून त्यांचे मतदान फक्त दोन किंवा तीन गुंडांनी केले.एवढेच नव्हे तर मयत झालेल्या मतदारांचे सुद्धा मतदान करण्यात आले आहे.त्याचप्रमाणे अनेक मतदान केंद्रावरील सीसीटीव्ही प्रशासनाला हाताशी धरून बंद ठेवण्यात आले व त्या ठिकाणी बोगस मतदान करण्यात आले. बोगस मतदान करताना आयडी प्रूफ च्या नोंदी या चुकीच्या व बोगस केलेल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेज चालू आहेत किंवा बंद आहेत व तसेच सर्व फुटेज मागवून घ्यावेत व त्याची शहानिशा करावी अशा प्रकारची मागणी ॲड माधव जाधव यांनी केंद्रीय निवडणूक आयोग यांचे ऑनलाईन तक्रार पोर्टल एनजीएसपी या वेबसाईटवर जाऊन वोटर्स मित्र या पोर्टलवर ॲड.माधव जाधव यांनी रीतसर तक्रार नोंदवली आहे. तसेच परळी विधानसभा मतदारसंघातील बोगस झालेल्या मतदान केंद्राची नावे सुद्धा ॲड.माधव जाधव यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला कळवली आहेत या मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये व तसेच महाराष्ट्र राज्याच्या बाहेरचा पोलीस फोर्स मागवून पुन्हा निवडणूक घेण्याबाबत ॲड.माधव जाधव यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला विनंती केली आहे. ❊❊

# दहावीच्या परीक्षेत गंगामसला न्यू हायस्कूल शाळेचा १०० टक्के निकाल

माजलगाव, (बातमीदार):- गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेचा तालुक्यातील गंगामसला न्यू हायस्कूल शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

या परीक्षेला शाळेतून ५९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी विशेष प्राविण्यासह १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर प्रथम श्रेणीत ३० व द्वितीय श्रेणीत ११ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ.सतिशभाऊ चव्हाण व सर्व कार्यकारिणी संचालक तसेच शालेय समितीचे अध्यक्ष अविनाश सोळंके व इतर सर्व सदस्य, मुख्याध्यापक एस.पी.देशमुख यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंदांनी केले आहे. ❊❊

# माजलगाव पाटबंधारे विभागाचा कार्यकारी अभियंता एसीबीच्या जाळयात; २८ हजाराची लाच घेताना पकडले

परळी वैजनाथ, (बातमीदार):- माजलगाव पाटबंधारे विभाग परळी (वर्ग १) कार्यकारी अभियंता राजेश आनंदराव सलगरकर या लोकसेवकास तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती काढून शेतात टाकण्यासाठी माजलगाव पाटबंधारे विभागाचे कार्यालयात गाळ व माती काढण्याची परवानगी मिळण्यासाठी २८ हजाराची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहाथ पकडले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड युनीटने ही कारवाई केली आहे.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यातील ३५ वर्षिय तक्रारदार व साक्षीदार आणि गावातील त्यांचे ५ सहकारी शेतकरी यांनी चिंचोटी तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती काढून शेतात टाकण्यासाठी माजलगाव पाटबंधारे विभागाचे कार्यालयात गाळ व माती काढण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. हे अर्ज कार्यालयीन प्रक्रियेनुसार लोकसेवक राजेश सलगरकर यांचेकडे परवानगी करीता प्रलंबित होते. लोकसेवक सलगरकर यांनी तक्रारदार व साक्षीदार यांना गाळ व माती काढण्यासाठी परवानगी देण्याकरिता प्रत्येकी पाच हजार रुपये प्रमाणे सात शेतकऱ्यांना ३५ हजार रुपयाची मागणी केली होती. तडजोडीअंती प्रत्येकी ४००० प्रमाणे २८ हजार रुपयांची मागणी करून ते स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि. २२/०५/२०२४ रोजी लोकसेवक सलगरकर यांचे माजलगाव पाटबंधारे विभागाच्या परळी वैजनाथ येथील कार्यालयात एसीबीने सापळा रचला. लोकसेवक सलगरकर यांनी पंचा समक्ष लाच रक्कम २८००० रुपये स्वीकारताच लाचरकमेसह त्यास रंगेहाथ पकडण्यात आले.त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन परळी वैजनाथ शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे .

ही कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अपर पोलिस अधीक्षकमुकुंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी - पोलीस निरीक्षक ला. प्र.वि .बीड. युनूस शेख, पर्यवेक्षण अधिकारी:- शंकर शिंदे पो उप अधीक्षक ला प्र वि बीड,पोलीस निरीक्षक गुलाब बाचेवड ,सुरेश सांगळे, श्रीराम गिरम ,अविनाश गवळी , भरत गारदे,अमोल खरसाडे,अंबादास पुरी,स्नेहल कुमार कोरडे, गणेश मेहेत्रे यांच्या पथकाने केली आहे. ❊❊❊

# सिरसाळा येथील न्यू हायस्कूल शाळेचा दहावीच्या परीक्षेत ९६.१२ टक्के निकाल

परळी वैजनाथ, (बातमीदार):- गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेचा तालुक्यातील सिरसाळा येथील न्यू हायस्कूल शाळेचा निकाल ९६.१२ टक्के लागला असून सागर मारोती वाघमोडे ९५.८० टक्के गुण घेवून शाळेतून पहिला आला आहे.

या परीक्षेला शाळेतून २५८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी विशेष प्राविण्यासह ९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर प्रथम श्रेणीत ८९ व द्वितीय श्रेणीत २२ तर तृतीय श्रेणीत ८ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.२५८ पैकी २४८ विद्यार्थी परीक्षेत यशस्वी झाले आहेत. ९३.६० टक्के गुण घेवून गौरी मनोहर घाडगे शाळेतून दुसरी, ९३.२० टक्के गुण घेवून मैथीली व्यंकटराव नागरगोजे तिसरी आली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ.सतिशभाऊ चव्हाण व सर्व कार्यकारिणी संचालक तसेच शालेय समितीचे अध्यक्ष भागवतबप्पा देशमुख व इतर सर्व सदस्य, मुख्याध्यापक श्री घोळवे, पर्यवेक्षक श्री डोंगरे यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंदांनी केले आहे.❊

# मान्सूनपूर्व स्वच्छतेच्या कामांना वेग; मोठ्या नाल्यांची परळी पालिकेकडून साफसफाई सुरू

परळी वैजनाथ (बातमीदार):- नगर परिषदच्या वतीने शहरातील मोठ्या नदी व नाल्यांच्या सफाईचे काम सुरू करण्यात आले आहे. मान्सून तोंडावर आला असताना नगरपालिका क्षेत्रातील लहान-मोठ्या नाल्यांची सफाईच्या कामे वेगाने सुरु आहेत. यासाठी जे.से.बी., ट्रॅक्टर आदी मशनरीसह स्वतंत्र मजुरांची नियुक्ती करुन साफसफई करण्यात येत असल्याची माहिती देऊन यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी केले आहे.

शहरातील नाल्यामध्ये कचर्यामुळे पाणी साचु नये आणि नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येऊ नये यासाठी परळी पालिकेच्या स्वच्छता विभागाकडुन मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना गती देण्यात आली आहे. नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, उपमुख्याधिकारी संतोष रोडे व स्वच्छता निरीक्षक शंकर साळवे, विशाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागातील विश्वेश्वर डुबे, विलास केदारी, सुरेश वाल्मिकी, राजाभाऊ जगतकर, राजाभाऊ गायकवाड, जेसीबी चालक सिद्धार्थ कसबे, धनराज कसबे व सर्व अधिकारी आणि कर्मचार्यांच्या सहकार्याने पावसाळ्यापूर्व कामे हाती घेण्यात आली आहेत. पावसाळ्यात शहरातील मोठे नाले आणि नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येणार नाही. नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले.



परळी शहरातील सरस्वती नदी गोपाळ टॉकीज ते सार्वजनिक समशान भूमी, उखळवेस ते सिमेंट फेक्ट्री, मलिकपुरा, पंचायत समिती ते नाथ रोड, आझाद नगर (वीटभटी पूल) ते रेल्वे लाईन पुल तसेच विविध भागातील नाल्या यासह शहरातील विविध छोट्या मोठ्या नाल्यांमधील गाळ व कचरा काढण्यात येत आहे. यासाठी दोन जेसीबी, पाच ट्रॅक्टरद्वारे व कर्मचार्यांच्यासह्याने साफसफई करण्यात येत आहे. पावसाळा सुरु होई पर्यन्त ही साफसफाई करण्यात येणार असुन या काळात शहरातील ज्या नाल्या तुंबल्या आहेत. त्यातील गाळ काढण्यात येणार असुन नागरिकांनी आपला कचरा घंटागाडी मध्ये टाकावा असे आवाहन स्वच्छता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच हे सर्व कामे अंतिम टप्प्यात आले असल्याची माहिती दिली आहे.

शहरात कोणतेही काम करण्यासाठी नागरीकांचा पुढाकार आवश्यक असतो. पावसाळ्यात व्यापारी, नागरीकांना त्रास होऊ नये, शहरातील कोणतीही नाली तुंबू नये यासाठी पालिकेने साफसफईची कामे हाती घेतली आहेत. ही कामे युध्द पातळीवर करण्यात येत आहेत मात्र नागरिकांनीही कचरा नालीत टाकून पाणी वाहून जाण्यास अडथळा होईल असे करू नये, कर्मचारी करीत असलेल्या कामांना सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी केले आहे. ❊❊❊